POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-७६ ● मुंबई, शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## लाडक्या बहिणींसाठी अजून एक योजना
## व्यवसायासाठी मोठं भांडवल मिळणार

■मुंबई । प्रतिनिधी,

लाडक्या बहिणींसाठी मोठी आनंदवार्ता आली आहे. महिलांना आर्थिक आणि व्यावसायिक पाठबळ देण्यासाठी, व्यावसायिक मार्गदर्शन मिळणार आहे. सरकारने मोठी तयारी केली आहे. महिलांना एक लाख रुपयांपर्यंतचा कर्ज पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुंबई आणि परिसरातील महिलांना हे आर्थिक पाठबळ देण्यात आले आहे. महिला आणि बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी याविषयीची माहिती सोशल मीडियावर दिली आहे.






**५७ महिलांना मदतीचा हात**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतंर्गत लाभार्थी महिलांना मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दादर शाखेमार्फत हे स्तुत्य पाऊल टाकण्यात आले आहे. बँकेने व्यावसायिक कर्ज योजनेतून ५७ महिलांना कर्ज पुरवठा केला आहे. त्या धनादेशांचे वाटप मंत्री आदिती तटकरे यांनी केले. हा कर्ज धनादेश म्हणजे केवळ आर्थिक मदत नाही, तर राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांच्या उद्योजकतेला, त्यांच्या आत्मविश्वासाला दिलेले बळ असल्याची प्रतिक्रिया तटकरे यांनी दिली.

**व्यवसाय कौशल्यासाठी मदत**

महिलांना आर्थिक आणि व्यावसायासाठी आर्थिक पाठबळच देण्यात येणार नाही तर या महिलांना व्यावसायिक मार्गदर्शन पण करण्यात येणार आहे. त्यासाठी विविध सेवा पुरवणाऱ्या 'मार्केटिंग अँड बिझनेस डेव्हलपमेंट मल्टी-सर्व्हिस सेंटर'ची सुरुवात करण्यात आली आहे. त्यातंर्गत महिलांना विशेष मार्गदर्शन आणि सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यासाठी खास महिला कक्ष स्थापन्यात आला आहे. आता राज्यभरात ही सुविधा कधी उपलब्ध होते याकडे महिलांचे लक्ष लागले आहे.

**उद्योग-व्यवसायासाठी अर्थपुरवठा**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात सुरू करण्यात आली. या योजनेतंर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये सन्माननिधी देण्यात येतो. डीबीटी मार्फत ही रक्कम थेट त्यांच्या खात्यात जमा होते. या योजनेमुळे राज्यातील महिलांना आर्थिक मदत मिळत आहे. या योजनेत महिलांना व्यवसायासाठी आता १ लाखांपर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येणार असल्याचे समोर येत आहे. महिलांना ० टक्के व्याजदराने हा कर्ज पुरवठा होऊ शकतो. मुंबई आणि आजुबाजूच्या परिसरासाठी हा कर्ज पुरवठा करण्यात येतो. मुंबई बँकेने ३ सप्टेंबरपासून ही योजना लाडक्या बहिणींसाठी सुरू केली. या योजनेत १ लाखांपर्यंतचे कर्ज शुन्य टक्के व्याजदराने देण्यात येत आहे. सध्या योजना मुंबई शहर आणि उपनगरामध्ये लागू आहे. उर्वरित महाराष्ट्रामध्ये लवकरच योजना लागू होऊ शकते. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक महिलांना त्यांचा उद्योग व्यवसाय सुरु करता येणार आहे.




## सूर्य मावळताच सुरू पावसाचं थरारनाट्य



■मुंबई। प्रतिनिधी,

हवामान विभागाच्या पूवार्नुमानानुसार मागील २४ तासांमध्ये राज्याच्या बहुतांश भागांमध्ये सायंकाळी अचानक पावसाळी वातावरण पाहायला मिळालं. कुठे सोसाट्याचा वारा सुटला, कुठे ढगाळ वातावरणानं धडकी भरवली, तर कुठे विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होत पावसानं हजेरी लावली. अशा या वातावरणाचं चित्र येत्या २४ तासांमध्येही कायम राहणार असून, राज्यात प्रामुख्यानं मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाच्या मुंबई शाखेकडून वर्तवण्यात आलेल्या अंदाजानुसार कोकणापासून थेट गोव्यापर्यंत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पुढील २४ तासांमध्ये पावसाची हजेरी असेल. तर, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात मात्र हवामान कोरडं राहणार असून पहाटेच्या तापमानात घट नोंदवण्यात येईल. यादरम्यान वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० किमी इतका असेल. तर, काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. बहुतांश जिल्ह्यांमध्ये दिवस मावळतीला गेल्यानंतर पावसाचं हे थरारनाट्य सुरू होईल असाही प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. एकिकडे मान्सूनच्या परतीच्या चर्चा असतानाच दुसरीकडे पावसानं हजेरी लावणं म्हणजे नेमकं काय समजावं? हाच प्रश्न अनेकांच्या मनात घर करत असताना आता त्यामागची कारणंही समोर आली आहेत. अरबी समुद्राच्या आग्नेयेला लक्षद्वीप, केरळ, कर्नाटकचा दक्षिम भाग इथं कमी दाबाचं क्षेत्र तयार होणार असून, त्यामुळं ही प्रणाली राज्यातील पावसास कारणीभूत ठरत असल्याचं म्हटलं जात आहे. अरबी समुद्रातील ही प्रणाली सरत नाही, तोच बंगालच्या उपसागरामज्येही नव्यानं कमी दाबाचा पट्टा सक्रिय होत असल्या कारणानं आता दिवाळीच्या आठवड्यात या प्रणालीमुळं पावसाच्या सरी बरसणार का? हाच चिंतातूर करणारा प्रश्न उभा राहत आहे.

### सोशल मीडियावर भाईगिरीचा रील बनवणं पडलं महागात
## जळगाव पोलिसांनी घडवली अद्दल

■नाशिक। प्रतिनिधी,

भाईगिरीचे रील बनवणाऱ्या एता तरुणाला जळगाव पोलिसांनी चांगंलीच अद्दल घडवली आहे. सोशल मीडियावर भाईगिरीचा रील बनवणं या तरुणाला महागात पडलं आहे. त्याच्यावर कारवाई करत पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. इमरान भिस्ती असं या युवकाचं नाव आहे. पोलीस स्थानकात आणल्यानंतर इमरानने माफी मागणारा व्हिडिओ बनवला आहे. इमरान भिस्तीवर पोलिसांची प्रतिबंधकात्मक कारवाई केली आहे.

जळगाव शहरातील शाहूनगर परिसरात राहणाऱ्या इमरान भिस्ती या तरुणाने सोशल मीडियावर भाईगिरी दाखवणारा एक रील बनवून व्हायरल केला होता. संबंधित व्हिडिओ पोलिसांच्या निदर्शनास येताच त्यांनी तात्काळ कारवाई करत इम्रानला घरुन ताब्यात घेतले होते. पोलिस ठाण्यात आणल्यानंतर इम्रानला खाक्या दाखवताच त्याने लगेच माफी मागणारा व्हिडिओ बनवला. इम्रान विरुद्ध प्रतिबंधक कारवाई देखील करण्यात आली आहे. पोलिसांनी अशा प्रकारच्या व्हिडिओंद्वारे समाजात भीती पसरवणाऱ्या तरुणांना इशारा देत सांगितले की, भाईगिरी दर्शवणारे व्हिडिओ सोशल मीडियावर टाकल्यास कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल.



भाईगिरीचे रील बनवणाऱ्या एता तरुणाला जळगाव पोलिसांनी चांगंलीच अद्दल घडवली आहे. सोशल मीडियावर भाईगिरीचा रील बनवणं या तरुणाला महागात पडलं आहे.

## 'राज्यात निवडणुका होतील की नाही याबाबत शंका...'

■मुंबई। प्रतिनिधी,

मागील काही दिवसांपासून महाविकासआघाडीच्या शिष्टमंडळानं घेतलेली निवडणूक आयोग आयुक्तांची भेट, त्यांच्यापुढं मांडलेले प्रश्न आणि निवेदनं, यानंतर मविआनं घेतलेली पत्रकार परिषद आणि त्यात झालेला धक्कादायक खुलासा पाहता राज्यात सध्या निवणूक प्रक्रियेवरच जनसामान्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. मतदार याद्यांमध्ये असणारा घोळ समोर येत असल्या कारणानं सातत्यानं होणारे हे खुलासे पाहता आता आगामी निवडणूक जड जाणारा याची सरकारला जाणीव असून, याच कारणास्तव राज्यात आगामी काळात निवडणुका होतील की नाही, याबाबतच शंका असल्याचं वक्यव्य एका बड्या नेत्यानं केलं.

**निवडणुकांबाबत शंकाच शंका...**

'सरकारबद्दल राज्यात प्रचंड असंतोषाचं वातावरण असून, प्रत्येक टप्प्यावर सर्वच स्तरातल्या मतदारांना फसवून मतदान घेण्यात आलं आहे. मात्र आता मतदार जागरूक झालाय,त्यामुळे या निवडणुका सरकारला जड जाणार याची कल्पना असल्यामुळे निवडणुका होतील की नाही यावर शंका आहे', असं वक्तव्य शिवसेनेच्या ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी करत सत्ताधाऱ्यांना टोला लगावला. निवडणुकीबबात केलेल्या त्यांच्या वक्तव्यानं अनेकांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

**राज ठाकरे यांच्या सहभागाबाबत जाधवांची काय भूमिका?**

यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आम्ही आघाडी म्हणून कधीही लढलो नाही.... त्यामुळे राज ठाकरे यांच्या महाविकास आघाडीमध्ये येण्याच्या चर्चेमुळे आघाडीत मिठाचा खडा पडेल किंवा अन्य चर्चा व्यर्थच आहेत असं त्यांनी किमान शब्दांत स्पष्ट केलं. राज ठाकरेंनी 2017 मध्ये काँग्रेसच्या उमेदवाराचा प्रचार केला होता. त्यामुळं जर तेव्हा स्वतःचा पक्ष असतानाही काँग्रेसचा प्रचार करायला राज ठाकरे चालले तर आता का चालणार नाहीत? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.



**पक्ष, नेते, आमदार आणि आता थेट मतदारांची चोरी...**

सत्ताधाऱ्यांनी पक्ष चोरले, पक्षचिन्हं, निशाणी चोरली,आमदार चोरले,नेते चोरले....आता काय चोरायचं म्हणून मतदार चोरले. त्यामुळं राज्यात असे चोर ठेवायचे का, हा विचार मतदारांनी करण्याची गरज आहे, अशा शब्दांत त्यांनी सडकून टीका केली. दरम्यान इथं ठाकरेंची सेना निवडणुकीसाठी सज्ज असतानाच तिथं शिंदेंच्या सेनेकडून पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील काही भागांमध्ये महायुतीत निवडणुका लढण्याची शक्यता कमी असल्याचा सूर शिंदेंच्या पक्ष बैठकीत आळवला गेला. ज्यामुळं युतीत शक्य नसल्यास स्वबळावर लढण्यासाठी तयार राहण्याच्या सूचना या बैठकीदरम्यान देण्यात आल्याचं म्हटलं गेलं. बुधवारी एकनाथ शिंदे यांनी आमदारांची बैठक घेतल्यानंतर हे वृत्त सूत्रांमार्फत समोर आलं.

**महाविकास आघाडीने (मविआ) निवडणूक आयोगाशी काय चर्चा केली?**

मागील काही दिवसांपासून मविआच्या शिष्टमंडळाने निवडणूक आयोग आयुक्तांची भेट घेतली. त्यांच्यापुढे मतदार यादीतील घोळाबाबत प्रश्न मांडले आणि निवेदन दिले. त्यानंतर पत्रकार परिषदेत धक्कादायक खुलासे केले, ज्यामुळे राज्यात निवडणूक प्रक्रियेवर जनसामान्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

**आगामी निवडणुकांबाबत शंका का व्यक्त केल्या जात आहेत?**

मतदार यादीतील सातत्यपूर्ण घोळ आणि खुलासे यामुळे सरकारला आगामी निवडणुका जड जाणार याची जाणीव आहे. यामुळे राज्यात निवडणुका होतील की नाही, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

**राज ठाकरे यांच्या महाविकास आघाडीमध्ये येण्याबाबत भास्कर जाधव यांची भूमिका काय?**

भास्कर जाधव म्हणाले, ₹यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आम्ही आघाडी म्हणून लढलो नाहीत.₹ राज ठाकरे यांच्या सहभागामुळे आघाडीत मिठाचा खडा पडेल अशा चर्चा व्यर्थ आहेत.

## भर रस्त्यावरच खिळे टोचून टाकलं लिंबू... गावकरी घाबरले, तरूणाने त्याचंच केलं सरबत

■सांगली। प्रतिनिधी,

जग आता २१ व्या शतकात आहे, रोज नवनवे शोध लागतात, वाढत्या टेक्नॉलॉजीमुळे तर जग कुठल्या कुठे पोहोचलं आहे. मात्र असं असलं तरीही काही भागांत अजूनही अंधश्रद्धेचं सावट कायम असून त्यामुळे लोकांच्या मनात भीती निपजते. असाच एक अंधश्रद्धेचा प्रकार सांगलीजवळ घडला आहे. तिथे टाकळीत भर रस्त्यावरच चक्क अंधश्रद्धा दिसून आली. एका रस्त्यावर खिळे टोचून लिंबू टाकलेलं होतं, त्यामुळे गावकरी दहशतीखाली होते, मात्र त्यांना धीर देण्यासाठी व असे काही प्रकार नसतात हे दाखवण्यासाठी गावातील एका ग्रामस्थाने आणि तरुणाने ते लिंबू कापून त्याचे सरबत करून प्यायले. आणि अंधश्रद्धेचा प्रकार मोडून काढला.

**नेमकं प्रकरण काय?**

सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील टाकळी येथे गुरुवारी रस्त्यावरच चक्क अंधश्रद्धेचा प्रकार दिसून आला. रस्त्यावर चांदणीच्या आकाराची आकृती काढून त्यात लिंबू व कुंकू टाकून, लिंबूत खिळे मारून उतारा टाकला होता.



या प्रकाराने टाकली गावात काहीकाळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र एका ग्रामस्थाने आणि तरुणाने तो लिंबू कापून त्याचे सरबत करून प्यायल्याने आणि अंधश्रद्धेचा प्रकार मोडून काढला आहे.

ग्रामपंचायतीच्या नव्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. त्याच रस्त्यावर वतुर्ळामध्ये चांदणीची आकृती रेखाटून त्यामध्ये लिंबू व कुंकू टाकण्यात आले होते. लिंबूत खिळेही घुसविण्यात आले होते. सकाळी हा प्रकार ग्रामस्थांच्या निदर्शनास आला. त्यानंतर ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळी ग्रामस्थांची मोठी गर्दी झाली होती.

यावेळी गावातील काही सामाजिक कार्यकर्ते एकत्रित आले. त्यांनी हा अंधश्रद्धेचा प्रकार मोडून काढला. येथे खिळे घुसवून व कुंकू लावून टाकण्यात आलेले लिंबू घेऊन ते स्वच्छ धुतले. ते लिंबू पाण्यामध्ये पिळून ते सरबत पिऊन टाकले. अशा प्रकाराने माणसाच्या जीवनावर कोणताही परिणाम होत नाही. अशा गोष्टींना कोणीही घाबरू नये, असे आवाहन त्यांनी ग्रामस्थांना केले.

## मुंबईतील व्यावसायिकाने ५८ कोटी गमावले

■मुंबई। प्रतिनिधी,

सायबर गुन्हेगारीत दिवसेंदिवस कोटी कोटी रुपयांची उड्डाणे सुरू आहेत. शेअर मार्केटमध्ये व्यवहार करणाऱ्या एका ७२ वर्षीय व्यावसायिकाला डिजिटल अटकेत ठेवून तब्बल ५८ कोटी रुपये उकळण्यात आले. या प्रकरणी महाराष्ट्र सायबर पोलिसांनी तिघांना अटक केली असून त्यांच्या बँक खात्यामध्ये या गुन्ह्यातील प्रत्येकी २५ लाख रुपये वळते करण्यात आले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ ऑगस्ट रोजी सुब्रमण्यम आणि करण शर्मा अशी नावे सांगणाऱ्या दोघांनी वृद्धाला पहिल्यांदा संपर्क साधला. सीबीआय, ईडी यासारख्या तपास यंत्रणांचे अधिकारी असल्याचे त्यांनी भासविले. त्यानंतर दोघांनी त्यांच्या इतर साथीदारांच्या मदतीने वृद्ध व्यावसायिकाची चौकशी करण्यास सुरुवात केली. व्यावसायिक आणि त्याच्या पत्नीचा मनी लॉंडरिंगच्या गुन्ह्यात सहभाग आढळल्याची कागदपत्रे पाठविण्यात आली. आपल्या नावाची कागदपत्रे पाहून व्यावसायिक आणि त्याची पत्नी प्रचंड घाबरले. याबाबत कुणालाही काहीच सांगू नका असे बजावत त्यांनी व्हिडीओ कॉल सुरू केले.

## 'बदला' घेण्यासाठी महिलेने मुंबई लोकल ट्रेनच्या मोटरमनवर केली दगडफेक?

**काय आहे सत्य?**

व्हायरल व्हिडिओ नीट बघितल्यास तो मुंबईतील लोकलचा नसल्याचं स्पष्ट होतं. या व्हिडिओतील सर्वात महत्त्वाचा धागा म्हणजे लोकलच्या पुढच्या भागाचे डिझाईन. लोकलचा पुढील भाग, अर्थात मोटरमनचे केबिन नीट बघितल्यास ती मुंबईतील पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वे विभागातील लोकल गाड्यांसारखा नाही हे समजते. याउलट, त्या लोकलवर ''एफ' अशी खूण दिसते, जी ईस्टर्न रेल्वेची (पूर्व रेल्वे) असून ही लोकल प्रामुख्याने पश्चिम बंगाल आणि शेजारच्या राज्यांत धावते. उपलब्ध पुराव्यांवरून हा व्हिडिओ ईस्टर्न रेल्वे नेटवर्कअंतर्गत येणाऱ्या भागातील असल्याचं स्पष्ट होतं. रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी अद्याप घटनेचं नेमकं ठिकाण जाहीर केलेलं नाही, मात्र व्हायरल पोस्टला उत्तर देताना, ''हे प्रकरण संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आले आहे,'' असे उत्तर दिले असून असून ईस्टर्न रेल्वेच्या आरपीएफने हावडा आणि सियालदाह स्थानकांच्या आरपीएफला टॅग केलं आहे.



■मुंबई। प्रतिनिधी,

सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला असून त्यात एक महिला धावत्या लोकल ट्रेनच्या दारात उभं राहून शेजारच्या ट्रॅकवरून येणाऱ्या लोकलवर मोठा दगड फेकताना दिसत आहे. हा व्हिडिओ बघून अनेक नेटकऱ्यांनी हा प्रकार मुंबईत झाल्याचा दावा करीत संताप व्यक्त केला असून मुंबई पोलिसांना सोशल मीडियावर टॅग करून महिलेवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चचेर्चा विषय ठरतोय. ट्रेन 'मिस' झाल्याचा बदला घेण्यासाठी महिलेने दगडफेक केली अशा मजेशीर कमेंट्सही अनेक नेटकरी करीत आहेत. जाणून घेऊया ही घटना खरंच मुंबईत घडली आहे का आणि सत्य काय?

व्हायरल क्लिपमध्ये ती महिला हातात मोठा दगड धरून विरुद्ध दिशेने येणाऱ्या लोकलच्या मोटरमनच्या केबिनवर फेकताना दिसते. दगडफेकीनंतर ती शिवीगाळ करताना, जोरात ओरडतानाही दिसतेय, मात्र तिचे बोलणे स्पष्ट ऐकू येत नाही. या धक्कादायक प्रकारामुळे सोशल मीडियावर संतापाची लाट उसळली आणि अनेकांनी मुंबई पोलिसांना टॅग करून कठोर कारवाईची मागणी केली. अगदी मुंबई पोलिसांच्या अधिकृत खात्यानेही सुरुवातीला या व्हायरल पोस्ट्सवर विश्वास ठेवून 'एक्स' (पूर्वीच ट्विटर) वर मुंबई सरकारी रेल्वे पोलिसांना तपासासाठी टॅग केलं. मात्र लवकरच रेल्वेप्रेमी आणि तथ्य पडताळणी करणाऱ्या खात्यांनी या व्हिडिओतील काही महत्त्वाच्या तपशीलांकडे लक्ष वेधलं.

दरम्यान, महिलेने दगडफेक का केली आणि काही कारवाई झाली की नाही याबाबत अजून माहिती अद्याप मिळालेली नाही.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## आणखी एका देशात 'जेन झी'द्वारे सत्तांतर



**नेपाळपाठोपाठ तब्बल चार देशांमध्ये 'जेन झी' रस्त्यावर उतरले. ह्यजेन झीह्नचे नेमके म्हणणे काय आहे? सत्ताधाऱ्यांना खाली खेचणे हाच त्यांचा उद्देश आहे की अन्य? यातून जगाने कोणता धडा घ्यायचा?**

आफ्रिका खंडातील मादागास्कर या द्विपावर मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. मादागास्करचे राष्ट्रपती अँद्री रजोएलिना यांनी १४ ऑक्टोबर रोजी एका आदेशाद्वारे संसद बरखास्त केली. कारण, त्यांच्याविरोधात महाभियोगाचा प्रस्ताव आणला जाणार होता; मात्र, संतप्त संसद सदस्यांनी बहुमताने रजोएलिना यांच्यावरील महाभियोग मंजूर केला. यामुळे देशात दुहेरी सत्तासंघर्ष निर्माण झाला. राष्ट्रपती विरुद्ध संसद. अर्थात याचे अन्य पडसादही उमटले. लष्कराच्या 'कॅपसॅट' या विशेष विभागाने तडकाफडकी सत्ता ताब्यात घेतली. कॅपसॅट प्रमुख कर्नल मायकेल रँड्रियनिरीना म्हणाले की, देशात तात्पुरते प्रशासन स्थापन केले जाईल आणि नंतर पुन्हा नागरी सरकारकडे सत्ता दिली जाईल. मादागास्करमधील ही उलथापालथ अचानक झालेली नाही. 'जेन झी' (तरुणांनी)ने चालवलेले मोठे आंदोलन त्यास कारणीभूत आहे. देशात वीज आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा खंडित झाल्याने तरुण अस्वस्थ झाले. किमान रोज लागणाऱ्या सुविधाही मिळत नसल्याने त्यांचा संताप झाला. त्यातच देशामध्ये भ्रष्टाचार, बेरोजगारी, महागाई यासह अन्य प्रश्नही उग्र झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. हळूहळू त्याची तीव्रता वाढत गेली. पोलिसांनी दडपशाही सुरू केली. पाठोपाठ लष्करातील काही युनिट्सनी आदेश पाळण्यास नकार देऊन तरुणांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला. हजारो तरुण रस्त्यावर उतरले. याचदरम्यान हिंसक आंदोलनात २२ तरुणांचा मृत्यू झाला. लष्कराच्या कॅपसॅटने संसद, निवडणूक आयोग आणि घटनाबाह्य संस्थांचे अधिकार स्थगित केले आणि राष्ट्रपतींच्या विरोधात सत्ता हस्तगत केली. कर्नल रँड्रियनिरीना यांनी जाहीर केले की, ''देशात पुन्हा स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी आम्ही हस्तक्षेप केला आहे. दोन वर्षांत आम्ही नवीन संविधान तयार करू आणि नागरी शासनाकडे सत्ता परत देऊ.'' आफ्रिकेत अलीकडच्या लष्करी बंडांच्या मालिकेत आणखी एक भर पडली आहे. तरुण पिढीच्या असंतोषातून उद्भवलेले हे बंड राजकीय प्रणालीतील खोलवरच्या समस्या दाखवत आहे. नजीकच्या काळात तेथे लोकशाही पुनर्स्थापना शक्य होईल का, हा मोठा प्रश्न आहे. मादागास्कर द्विपावरील आंदोलन केवळ स्थानिक असंतोषाचे द्योतक नाही, तर ते नव्या पिढीच्या विचारांचे प्रतिबिंब आहे. देशातील राजकीय अस्थैर्य, भ्रष्टाचार आणि मूलभूत सुविधा न मिळाल्यामुळे निर्माण झालेला संताप प्रदर्शित करतो. राजधानी अंतानानारिवो आणि संपूर्ण देश अस्थिर झाले आहे. 'जेन झी मादागास्कर' या तरुणांच्या संघटनेने सोशल मीडियाच्या माध्यमातून आंदोलनाची धार वाढविली. अखेर सत्ताधाऱ्यांना खाली खेचण्यात आले. मात्र, लष्कराने सूत्रे हाती घेतल्याने आंदोलन यशस्वी झाले का? युवकांना अपेक्षित असलेला बदल घडला का? आर्थिक संकट, वाढती बेरोजगारी, शिक्षण व आरोग्य यांसारख्या क्षेत्रांतील ढासळती व्यवस्था, सत्ताधाऱ्यांची उदासीनता, तरुणाईच्या आशा-आकांक्षा यांचा एकत्रित परिणाम म्हणून या आंदोलनाची ठिणगी पडली. नेपाळ, श्रीलंका, केनिया अशा विविध देशात 'जेन झी' यांनी आक्रमक होत बदलाचा प्रारंभ केला आहे. त्यामुळे त्या देशांच्या राजकीय नकाशावर नवा अध्याय लिहिला जात आहे. या आंदोलनात जसा आशेचा किरण आहे तसेच धोकेही. एकीकडे, युवकांनी आपल्या हक्कांसाठी लढण्याचे धैर्य दाखवले. भ्रष्टाचारविरोधी लाट आणि सामाजिक न्यायाची मागणी यामुळे देशात लोकशाहीबद्दलची जागरूकता वाढली आहे. पण दुसरीकडे, सैन्याचा राजकारणात हस्तक्षेप हा धोक्याचा इशारा आहे. इतिहास सांगतो की, ज्या देशात सैन्य सत्तेत आले, तिथे लोकशाही पुन्हा रुजवणे कठीण झाले आहे. नेतृत्वाची उणीव, अस्पष्ट ध्येय आणि राजकीय शून्यता या गोष्टी भविष्यासाठी चिंताजनक आहेत. मादागास्कर समोरचा प्रश्न आता केवळ शासन बदलाचा नाही, तर व्यवस्था बदलाचा आहे. जर संक्रमणकाळात सैन्याने सत्ता जनतेकडे परत दिली, तर ही क्रांती सकारात्मक ठरू शकते. पण सत्तेची चव लागल्यावर सैन्य माघार घेईल का? देशातील न्यायसंस्था, निवडणूक आयोग आणि स्वतंत्र प्रसारमाध्यमे यांचा स्वायत्तपणा जपला गेला, तरच लोकशाहीचे मूळ टिकेल. नागरिकांनीही जबाबदार राहून शांततामय बदलाला साथ देणे आवश्यक आहे. मादागास्करमधील आंदोलन हे आजच्या जगातील नव्या प्रवृत्तीचे प्रतीक आहे. सत्ता आणि व्यवस्था यांना तरुणाई प्रश्न विचारत आहे. ही लाट फक्त आफ्रिकेतच नव्हे, तर जगभर पसरत आहे. मादागास्करमधील परिस्थिती सुयोग्यरीत्या हाताळली गेली तर तो लोकशाहीचा नवा अध्याय लिहू शकतो. परंतु जर सत्तेचा खेळ जुन्याच पद्धतीने सुरू राहिला, तर इतिहास पुन्हा तोच चक्राकार फिरताना दिसेल. जगभरात 'जेन झी' आंदोलनाची चर्चा सुरू आहे. १९९७ ते २००२ या काळात जन्मलेल्या तरुणाईला 'जेन झी' म्हटले जाते. हा जमाव सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समस्यांबद्दल संवेदनशील आहे. पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण यासारख्या सार्वजनिक सुविधांचा अभाव, बेरोजगारी आणि संधींची कमतरता, भ्रष्टाचार, अन्याय, महागाई, लोकशाही व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे प्रश्न तसेच सोशल मीडियाच्या मदतीने संघटन ही 'जेन झी'ची वैशिष्ट्ये आहेत. श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळमधील 'जेन झी'च्या आंदोलनाचा उद्रेक आणि तेथे घडलेले सत्तांतर जगाने पाहिले आहे. चतुःसूत्रीवर 'जेन झी'चा भर आहे. त्यात सोशल मीडियाचा रणांगण म्हणून वापर, अहिंसक पण ठाम भूमिका, लोकशाही मूल्यांची पुनर्स्थापनेची मागणी आणि जागतिक प्रेरणा व एकात्मता यांचा समावेश आहे. 'जेन झी' केवळ आंदोलक नाही तर ते सरकारवरील दबाव गट आणि बदलाचे सूत्रधार झाले आहेत. भारतातही 'जेन झी' आंदोलन सुरू आहे. सामाजिक न्याय व नागरिक स्वातंत्र्य, पर्यावरणीय चळवळी, डिजिटल स्वातंत्र्य, रोजगार व शिक्षणातील असमानता याविषयी ते सक्रिय आहेत. 'जेन झी' आंदोलनाकडे सर्वंकषरीत्या पहायला हवे. ही अशी पिढी आहे की, जिला हवे ते इन्स्टंट (तातडीने) मिळते. त्यामुळे त्यांच्याकडे संयमाचा अभाव आहे. यातूनच अघटित घडण्याची भीतीही आहे. 'जेन झी' यांच्या अपेक्षा आणि मागण्या वेगळ्या आहेत. त्या जाणून घेणे, त्यांची स्पंदने, विचार लक्षात घेणे आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर त्यांच्याकडे नवनवीन आयुधे उपलब्ध आहेत. 'जेन झी'ला वेसण घालण्यापेक्षा त्यांचा वापर विधायक कामासाठी होऊ शकतो. त्यांच्या चळवळींना योग्य दिशादर्शन आणि बळ द्यायला हवे. त्यांची वैचारिक बैठक पक्की करायला हवी. उथळ आणि तात्पुरत्या किंवा तत्कालिक उपायांऐवजी चिरकाल आणि शाश्वत बदलांवर जोर द्यायला हवा. 'जेन झी' हा समाजाचाच एक घटक आहेत. त्यामुळे त्यांच्यावर लक्ष ठेवणे आणि त्यांच्या घडामोडींचा अंदाज घेणे हे समाजानेही करायला हवे. जिथे ते चुकत असतील तेथे त्यांना योग्य ती समज देण्याची जबाबदारी समाजाकडेही आहे. केवळ सरकार, प्रशासन किंवा राजकारणी यांच्यावर सोपवून हे चालणार नाही. जबाबदारी प्रत्येक घटकाचीच आहे. जे चांगले आहे त्याचे कौतुक करणे, चूक असेल, तर ती सुधारणे आणि योग्य दिशेने जाण्यास भाग पाडणे हे सारे आव्हानच आहे. खासकरून आजच्या आधुनिक पिढीचे तर अधिकच. जगभरातील 'जेन झी' आंदोलनाच्या ठिणग्यांकडे एकत्रित पाहिले तर मोठी चळवळ निर्माण झाल्याचे दिसते. सर्वसामान्यांना खिजगणतीतही न धरणाऱ्या सत्ताधारी, हुकूमशहा, लष्करशहा आणि राजकारण्यांना सणसणीत चपराक लगावण्याची क्षमता 'जेन झी'मध्ये आहे. मात्र, या 'जेन झी'चा वापर कुणी करते आहे का? त्यांच्या डोक्यावर बंदूक ठेवून वेगळाच निशाणा लावला जात आहे का? त्यांना मोठे बळ देऊन विध्वंसक काही घडवले जात आहे का? त्यांना भडकवण्याचे उद्योग होत आहेत का? याचीही खातरजमा करायला हवी. अन्यथा नागरी वस्तीत आणि समाजात वावरणारे 'जेन झी' हे दहशतवाद्यांपेक्षाही स्फोटक ठरण्याची भीती नाकारता येत नाही.

## नक्षलवादाच्या मुळावर घाव घातल्याचा चांगला परिणाम



सशस्त्र नक्षलवाद्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सरकारने राबवलेल्या मोहिमेला दिवसेंदिवस मोठे यश मिळत आहे. देशातील नक्षलवाद्यांना शस्त्र खाली ठेवायला सांगून यांचे पुनर्वसन करण्याची योजना केंद्र सरकारने यापूर्वीच जाहीर केली होती. याला प्रतिसाद न देर्णायांशी दोन हात करून त्यांचा खात्मा करण्यातही सरकार पुढे होते. अखेर या प्रयत्नांना यश आल्याचे बुधवारी अधोरेखित झाले. पाच राज्यांमधील नक्षलवादी हल्ल्यांचा सूत्रधार आणि मोस्ट वॉन्टेड नक्षलवादी टॉप कमांडर मल्लोजुला वेणुगोपाल राव ऊर्फ भूपती याने त्याच्या ६० हून अधिक नक्षली साथीदारांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी आत्मसमर्पण केले. भूपती हा माओवादी संघटनेच्या केंद्रीय समितीचा सदस्य आणि पॉलिट ब्युरोचा तगडा सदस्य होता. भूपती हा सोनू, सोनू दादा, वेणुगोपाल, अभय, मास्टर, विवेक आणि वेणू यासारख्या अनेक नावांनी ओळखला जातो. भूपतीच्या आत्मसमर्पणामुळे नक्षलवादी चळवळीचा अंत जवळ आल्याचे म्हटले जात आहे, याचे श्रेय निश्चितच केंद्र सरकारला आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाला द्यावे लागेल.


वास्तविक सुरक्षा दलांनी कोंडी केल्यामुळे नक्षलवादी आणि त्यांचे नेते अडचणीत सापडले आहेत. विशेष म्हणजे यंदा चार महिन्यांत दोनदा नक्षलवाद्यांनी सरकारसमोर शस्त्रसंधी तसेच शांतीचा प्रस्ताव ठेवला होता. यात भूपती आघाडीवर होता. तेव्हाच नक्षलवाद्यांमध्ये उभी फूट पडल्याचे निश्चित झाले होते. यंदा मे महिन्यात नक्षलवाद्यांनी पहिल्यांदा नक्षलवाद्यांविरोधात कारवाई थांबवण्याची सरकारकडे विनंती केली होती. मात्र, सरकारने त्यांच्या आवाहनाला अजिबात जुमानले नाही. उलट छत्तीसगड तसेच दंडकारण्यातील सुरक्षा यंत्रणांच्या कारवाया अधिक जोमाने सुरू ठेवल्या. त्यानंतर २१ मे रोजी नक्षल्यांचा सर्वोच्च नेता खंबाला केशवराव ऊर्फ बसवराजू याला चकमकीत ठार करण्यात आले. यामुळे नक्षलवाद्यांना मोठा धक्का बसला होता. त्यानंतर भूपतीने पुन्हा पत्रक काढून सरकारकडे शस्त्रसंधीची विनंती केली होती. १७ सप्टेंबर रोजी त्याने अल्पकाळासाठी शस्त्रसंधीची तयारी दाखवली होती. भूपतीची ही भूमिका केंद्रीय समितीतील सदस्यांना अजिबात पटली नाही. भूपती हा नक्षलवादी संघटनेचा प्रभावशाली रणनीतिकार मानला जातो. तो अनेक वर्षे महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील प्लाटूनचा मार्गदर्शक होता. असे असूनही त्याने सशस्त्र संघर्ष निष्फळ ठरल्याचे मान्य करून शस्त्रसंधी स्वीकारण्याचे आवाहन केले होते.

संघर्ष नव्हे तर संवादच पर्याय आहे, अशी भूमिका तो वारंवार घेत होता. मात्र, भूपती या निर्णयाप्रती एका रात्रीत आला नव्हता. कारण दोन दशकांत गडचिरोली जिल्ह्यात ७०० हून अधिक नक्षलवाद्यांनी आत्मसर्मपण करून शांततेत जगण्याचा मार्ग स्वीकारला होता. सरकारनेही त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी स्वीकारली होती. आणखी एक महत्त्वाची घटना या वर्षाच्या सुरुवातीलाच घडली. भूपतीची पत्नी नक्षलवाद्यांच्या दंडकारण्य विभागाची सदस्य विमला ऊर्फ तारक्का हिने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसर्मपण केले होते. तर केंद्रीय समिती सदस्य आणि सर्वोच्च महिला नक्षल नेत्या पोथुला पद्मावती ऊर्फ सुजाता हिने सप्टेंबरमध्ये शरणागती स्वीकारली होती. सुजाता ही भूपतीची वहिनी आहे. तर भूपतीचा मोठा भाऊ किशनजी २०११ मध्ये पश्चिम बंगालमधील चकमकीत ठार झाला होता. त्यामुळे संघषार्पेक्षा संवादच महत्त्वाचा याची प्रचिती भूपतीला येत होती. शिवाय त्याच्या घरातील सदस्यच आत्मसमर्पण करत होते. त्यामुळे लढून उपयोग होत नाही, याची जाणीव त्याला झाली होती. म्हणून भूपती वारंवार शस्त्रसंधीचा प्रस्ताव सरकारपुढे ठेवत होता.

भूपती वाणिज्य शाखेतील पदवीधर आहे. २०१० मध्ये माओवादी प्रवक्ते चेरुकेरी राजकुमार (आझाद) यांच्या हत्येनंतर भूपती माओवाद्यांचा आवाज बनला होता. त्याने जवळजवळ चार दशके रेड कॉरिडॉरमध्ये दहशत पसरवली होती. विशेष म्हणजे अनेक मोठ्या हल्ल्यांचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यात भूपतीचा सहभाग होता. त्यामुळे महाराष्ट्रासह ओडिशा, तेलंगणा, छत्तीसगड आणि आंध्र प्रदेशासह अनेक राज्यांतील पोलीस त्याच्या मागावर होते. भूपतीला पकडून देण्यासाठी सरकारने १ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. यावरून भूपतीची दहशत आणि त्याचे नक्षलींमधील स्थान लक्षात येते. नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी मोदी सरकारने दशकापूर्वी योजना आखली होती. त्यांच्या विरोधात सशस्त्र कारवाई अधिक कडक केली होती.

नक्षलवाद्यांनी एकतर शस्त्र ठेवून आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात सहभागी व्हावे अन्यथा त्यांचा सशस्त्र कारवाईत खात्मा करायचा, हे दोनच पर्याय केंद्र सरकारने त्यांच्यासमोर ठेवले होते. त्यानंतरही नक्षलींकडून वारंवार कमांडोंवर हल्ले सुरूच होते. मात्र, न डगमडता सरकार त्यांचे हल्ले परतवून कारवाई करत होते. या मोहिमेचा परिणाम असा झाला की हळूहळू नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पणाचा मार्ग स्वीकारायला सुरुवात केली. आताही भूपतीनंतर आणखी काही नक्षलवादी आत्मसमर्पण करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. नक्षलवाद्यांची सशस्त्र मोहीम हाणून पाडण्यात सशस्त्र दलाला यश येत आहे, हे यश केंद्र सरकारने राबवलेल्या मोहिमेचे आहे. याबद्दल केंद्र आणि राज्य सरकारचेही अभिनंदन करायला हवे!

## आध्यात्मिक प्रगती



आध्यात्मिक प्रगती ही मानवाच्या आत्मिक शांती आणि परमसत्य यांच्याशी संवाद साधण्याची प्रक्रिया आहे. आध्यात्मिक प्रगती साधण्यासाठी सर्वच धर्म आपापल्या रीतीने, विविध मार्ग सुचवतात. हे सुचवलेले मार्ग वेगवेगळे असले तरी त्यांचे मूळ उद्दिष्ट एकच आहे. हे उद्दिष्ट आहे ते आत्म्याचे शुद्धीकरण आणि जीवनाचा खरा अर्थ समजणे. हिंदू, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, इस्लाम, शीख आणि इतर कुठलाही धर्म घ्या. या सगळ्याच धर्मांच्या तत्त्वांमध्ये अध्यात्मिक प्रगतीचे मार्ग आपल्याला सापडतात. हिंदू धमार्बाबतचे उदाहरण घेऊ या. हिंदू धर्मात ज्ञानयोग, भक्तियोग आणि कर्मयोग या मार्गांवर अधिक भर दिलेले आहे, असे आढळते. भगवद्गीता हा ग्रंथ आणि उपनिषदे हे आत्म्याचे स्वरूप आणि विश्वाशी नाते समजण्यासाठी मदत करतात. ध्यान आणि आत्मपरीक्षण या मार्गांवर चालणाऱ्यांचे मन शांत होते. बौद्ध धर्माचे उदाहरण बघू या. बौद्ध धर्मात बुद्धांच्या अष्टांगिक मार्गाद्वारे (सम्यक दृष्टी, संकल्प, वाणी, कर्म इत्यादी) मनाची शुद्धी आणि निर्वाण या गोष्टींची प्राप्ती शक्य होते. जैन धर्मामध्ये अहिंसा, सत्य आणि अपरिग्रह आदी तत्त्वे महत्त्वाची आहेत. या तत्त्वांद्वारे आत्मशुद्धीवर भर दिला गेला आहे, असे दिसून येते. ख्रिश्चन धर्मात प्रार्थना, प्रेम आणि क्षमा यांद्वारे परमेश्वराशी नाते जोडले जाते. इस्लाम धर्म हा पाच स्तंभ (नमाज, रोजा, जकात, हज, शहादा) आणि कुरआन यांच्या शिकवणींवर आधारित आहे; तर शीख धर्मात नामस्मरण, कीर्तन आणि सेवा या गोष्टींना प्राधान्य दिले जाते, जे गुरु ग्रंथ साहिबच्या मार्गदर्शनाने साधले जाते. या सर्व धर्मांचा विचार करता, ध्यान, प्रार्थना, निःस्वार्थ सेवा आणि नैतिक जीवन या गोष्टींवर जोर दिलेला आहे. कुठलाही धर्म घ्या, त्यात ध्यान आणि आत्मपरीक्षण हे मन शांत करण्याचे साधन आहे, हे अधोरेखित केलेले आढळते. सेवा आणि करुणा, मग ती हिंदू धमार्तील दान, इस्लाममधील जकात किंवा ख्रिश्चन धमार्तील प्रेम असो, सर्वांना जोडते. नैतिकता आणि सत्यनिष्ठा यांद्वारे सर्व धर्म आत्मिक प्रगतीचा मार्ग दाखवतात, त्याचे दिशादर्शन करतात.

## काँग्रेसला आणखी एका ठाकरेंचे ओझे नकोय





स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोन भावांच्या गाठीभेटी वाढत असल्यामुळे एका बाजूला आनंदाला उधाण आलेले आहे. त्याच वेळी उद्धव ठाकरे ज्या महाविकास आघाडीत आहेत, त्यातील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसने राज ठाकरेंच्या मविआमधील समावेशाबाबत अनुत्सुकता दर्शविलेली आहे. त्यामुळे ठाकरे बंधू कुठल्या फॉर्म्युल्याच्या आधारे एकत्र येणार याबद्दल उत्सुकता वाढलेली आहे. काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असल्यामुळे प्रादेशिक नेत्यांचे आणि पक्षांचे महत्त्व त्यांना वाढू द्यायचे नसते, आधीच उद्धव ठाकरे यांच्या प्रभावामुळे वाकलेली काँग्रेस आणखी एका ठाकरेंना समाविष्ट करून अधिक अवघडून जाऊ इच्छित नसावी, त्यामुळेच त्यांनी आता स्वबळाची भाषा केली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यातील गाठीभेटी वाढू लागल्यावर सगळ्यात जास्त कुणाची चिंता वाढली असेल तर ती काँग्रेसची. त्यामुळे काही दिवसांपूर्वी काँग्रसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगून टाकले की, महाविकास आघाडीत चौथ्या भागीदाराची आम्हाला गरज नाही. त्यामुळे ठाकरे बंधूंच्या गाठीभेटीमुळे रंगात आलेल्या वातावरणामध्ये मिठाचा खडा पडला. दोन्ही भावांनी एकत्र यावे यासाठी उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत जोरदार फिल्डिंग लावत आहेत. काही वेळा दोन्ही भावांनी पडद्यामागे एकत्र येऊन निवडणुका लढवण्याचे निश्चित केले असून ते सगळ्यांच्या समोर अचानक येतील आणि आश्चर्याचा धक्का देतील, जे महाराष्ट्राच्या मनात आहे तेच होईल, अशी विधाने ते सातत्याने करत आहेत. काही वेळा ते काल्पनिक विधाने करून गोत्यात येत आहेत, पण त्यांचा आशावाद अखंड आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे हिंदी सक्तीविरोधात मराठीच्या मुद्द्यावर ५ जुलैला वरळी डोममध्ये एकत्र आले. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी आम्ही एकत्र राहण्यासाठी एकत्र आलो आहोत, असे जाहीर केले. त्यानंतर तर संजय राऊत यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्यानंतर गणपतीपासून दोन्ही ठाकरे बंधू एकमेकांच्या घरी जाऊ लागले.

कौटुंबिक भेटीगाठी होऊ लागल्या. त्यामुळे संजय राऊत यांचा आत्मविश्वास अधिक वाढला. पण त्यांना हे माहीत आहे की, सध्या जरी ते महाविकास आघाडीत सोबत असले तरी त्यांचा क्रमांक एकचा शत्रू हा काँग्रेस होता. त्यामुळे एकवेळ शरद पवारांना मॅनेज करता येईल, पण काँग्रेसला मॅनेज करणे सोपे नाही. त्यामुळे काँग्रेसला खूश करण्यासाठी महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसला सोबत घेणे गरजेचे आहे, अशी राज ठाकरे यांची भूमिका आहे, असे त्यांनी परस्पर जाहीर करून टाकले. याविषयी मनसेचे नेते संदीप देशपांडे आणि बाळा नांदगावकर यांनी, आमच्या पक्षाची भूमिका आमच्या पक्षाचे नेते राजसाहेब ठाकरे किंवा पक्षाचे प्रवक्ते मांडतील, असे स्पष्ट केले. थोडक्यात, आमची भूमिका मांडण्याचा अधिकार संजय राऊत यांना नाही, असेच त्यांना सांगायचे होते. राऊतांच्या विधानाने काँग्रेस नेतेही अचंबित झाले. त्यानंतर सारवासारव करत काँग्रेसचे निर्णय हे राज्यात होत नसतात तर दिल्लीत होतात, असे राऊत यांनी सांगितले. त्यानंतर काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी मनसेला महाविकास आघाडीत घेण्याविषयी आमचा काही विचार झालेला नाही. त्यामुळे संजय राऊत कितीही उत्साही असले आणि दोन्ही भावांच्या गाठीभेटी होत असल्या तरी महाविकास आघाडी राज ठाकरे यांना कसे सामावून घेणार हा मोठा प्रश्न आहे.

मुळात एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. जेव्हा २०१९ च्या निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपद देण्यास भाजपने नकार दिला आणि त्यांनी बाहेर पडून शरद पवारांसोबत हातमिळवणी केली. त्यानंतर शरद पवार यांनी महाविकास आघाडीची स्थापना केली. त्यात त्यांनी काँग्रेसला येण्याचे आवाहन केले, कारण बहुमतासाठी काँग्रेसची गरज होती. पण जिथे शिवसेना आहे तिथे आम्ही येणार नाही, असे काँग्रेसने सांगून टाकले. पण मोदींना केंद्रीय पातळीवर थोपवता येत नसेल तर महाराष्ट्रातील भाजपची सत्ता घालवून त्यांची ताकद कमी करण्याची ही संधी आहे, असे पवारांनी काँग्रेसच्या प्रमुख नेत्या सोनिया गांधींना पटवून दिले. तेव्हा सोनिया गांधी तयार झाल्या, पण तरीही त्यांनी आपल्या राज्यातील नेत्यांना सत्तेत सहभागी न होता बाहेरून पाठिंबा द्या, असे सांगितले. काँग्रेस शिवसेनेपासून इतकी सावध भूमिका घेत होती. कारण काँग्रेसच्या मते शिवसेना हा प्रांतीयवादी पक्ष असल्यामुळे त्यांच्यासोबत गेल्यास आपल्याला इतर राज्यांमध्ये त्याचा धक्का बसेल. पण राज्यातील त्यांचे नेते म्हणाले की, आम्ही सत्तेच्या बाहेर राहिलो तरी पक्षाचे नुकसान होईल, कारण आम्हाला केवळ बघे बनून रहावे लागेल. त्यामुळे सत्तेत सहभागी होणे आवश्यक आहे, त्यामुळे सोनिया गांधी यांनी परवानगी दिली. त्यामुळे महाविकास आघाडीत काँग्रेस सहभागी झाली आणि या तीन पक्षांची सत्ता राज्यात आली. हातातोंडाशी आलेली सत्ता भाजपला गमवावी लागली.

महाराष्ट्रात मागील वर्षी विधानसभा निवडणूक झाली, त्याअगोदर महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून उद्धव ठाकरे यांचे नाव जाहीर करण्यात यावे, असे जोरदार लॉबिंग संजय राऊत करत होते, पण काँग्रेस आणि राष्ट्रवादीने तसे काहीही मान्य केले नाही. उलट, लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला आलेले यश पाहून महाविकास आघाडीचा पुढील मुख्यमंत्री काँग्रेसचा असेल असे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण आणि बाळासाहेब थोरात यांनी जाहीर करून शिवसेनेला धक्का दिला होता. त्यामुळे उद्धव ठाकरे नाराज झाले होते. महाविकास आघाडीच्या एका संयुक्त सभेत त्यांनी आपल्या भाषणात जोरदारपणे सांगून टाकले की, काँग्रेस आणि राष्ट्रवादीने मविआचा मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करावा, मी त्याचा स्वीकार करेन, पण तसे केले तर शिवसेनेचा जोर ओसरेल, असे वाटत असल्यामुळे त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार शेवटपर्यंत जाहीर केला नाही. शरद पवार यांच्या पक्षाचा प्रभाव महाराष्ट्रापुरता आहे, त्यामुळे ते तडतोड करतात, पण काँग्रेसचे तसे नाही. तो राष्ट्रीय पक्ष आहे, त्यामुळे त्यांना युती-आघाडी करताना राष्ट्रीय पातळीवर त्याचे काय परिणाम होतील, याचा विचार करावा लागतो. त्यात पुन्हा काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असल्यामुळे ते फार काळ दुसऱ्या पक्षाच्या पालखीचे भोई होत नाहीत, त्यांना प्रादेशिक पक्षांचा वापर करून आपली सत्ता स्थापित करायची असते.

महाविकास आघाडीत शिवसेना असताना काँग्रेस सहभागी झाली आणि दुय्यम स्थान घेतले. कारण ती त्यावेळची त्यांची गरज होती. पण कायम त्यांनी तसे केले तर त्यांच्या पक्षाचे नुकसान होईल. त्यामुळे ते उद्धव ठाकरे यांना फार मोठे होऊ देणार नाहीत. आता तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. स्थानिक पातळीवर आपल्या कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त संधी देण्याचा प्रयत्न प्रत्येक पक्ष करत असतो. यात मविआत मनसे आली तर अधिक गर्दी होणार आहे. याची काँग्रेसला कल्पना आहे. उलट, काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवाव्यात, अशी आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे, असे सोमवारी जाहीर करून सोबतच्या दोन पक्षांनाच धक्का दिला आहे. त्यामुळे राज ठाकरे यांना महाविकास आघाडीत सामावून घेण्याचे फारच दुरापास्त दिसते.

महाराष्ट्रात हिंदी भाषा सक्तीच्या विरोधात आणि मराठी माणसांच्या मुद्द्यावर वरळी डोम येथे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची संयुक्त सभा झाली होती, त्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससह अन्य काही पक्षांचे काही नेते उपस्थित होते, पण काँग्रेसचे कुणीही नव्हते. हिंदी सक्तीवर काँग्रेसने बाहेरून विरोध केला होता, पण उद्धव आणि राज ठाकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्याला प्रतिसाद दिला नाही. मविआची स्थापना झाल्यानंतर उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री झाले आणि काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असूनही त्यांना दुय्यम स्थान स्वीकारून त्यांच्या हाताखाली काम करावे लागले. २०२४ साली विधानसभा निवडणुकीपूर्वी मविआने पुन्हा आपल्याला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून घोषित करावे, असे उद्धव ठाकरेंना वाटत होते, पण काँग्रेसला ते मान्य नव्हते. महाराष्ट्रात आपला पहिला मान असायला हवा, अशी ठाकरे कुटुंबियांची भूमिका राहिलेली आहे. त्याची काँग्रेसला कल्पना आहे. त्यामुळे जर राज ठाकरे मविआमध्ये आले, तर मविआची ताकद वाढू शकेल, पण मविआमधील ठाकरे बंधूंची ताकद वाढेल. त्यामुळे आपले महत्त्व कमी होईल. ते काँग्रेसला होऊ द्यायचे नाही. त्यामुळे अगोदरच उद्धव ठाकरे हे काँग्रेसला आपला प्रभाव दाखवत असताना आणखी एक ठाकरे आले तर आपल्याला आणखी अवघड जाईल, याचा काँग्रेसने विचार केला असावा. त्यामुळे मनसेला सोबत घेण्यास काँग्रेस नेते उत्सुक नाहीत.

# दिवाळीच्या इतिहासाशी निगडित ही माहिती तुम सर्वांसाठी नवी असू शकते...

- राक्षसांना मारण्यासाठी मातेने महाकालीचे रूप धारण केले. राक्षसांना मारूनही जेव्हा महाकालीचा राग शांत झाला नाही तेव्हा भगवान शिव स्वतः तिच्या पाया पडले. भगवान शंकराच्या शरीराला स्पर्श केल्याने देवी महाकालीचा कोप संपला. याच्या स्मरणार्थ तिच्या शांतीरुपी लक्ष्मीची पूजा सुरू झाली. या रात्री काली तिची उग्र रूपात पूजा करण्याची परंपरा आहे.

- मुघल राजवटीचा शेवटचा सम्राट बहादूर शाह जफर याने दिवाळी हा सण म्हणून साजरा केला आणि यानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभाग घेतला.

- शाह आलम क्कच्या काळात, संपूर्ण राजवाडा दिव्यांनी सजविला गेला होता आणि लाल किल्ल्यावर आयोजित कार्यक्रमांमध्ये हिंदू आणि मुस्लिम दोघेही सहभागी होत असत.

- पंजाबमध्ये जन्मलेल्या स्वामी रामतीर्थ यांचा जन्म आणि मृत्यू दिवाळीच्याच दिवशी झाला. दिवाळीच्या दिवशी गंगेच्या तीरावर स्नान करताना 'ओम' म्हणत त्यांनी समाधी घेतली.

- महर्षी दयानंद यांचे दिवाळीच्या दिवशी अजमेरजवळ निधन झाले, ते भारतीय संस्कृतीचे महान लोकनेते बनले. त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली.

- दीन-ए-इलाहीचा प्रवर्तक मुघल सम्राट अकबराच्या काळात दिवाळीच्या दिवशी दौलतखान्यासमोर ४० यार्ड उंच बांबूवर एक मोठा आकाशदिवा टांगण्यात आला होता. सम्राट जहांगीरनेही दिवाळी मोठ्या थाटामाटात साजरी केली.

- सम्राट विक्रमादित्यचा राज्याभिषेक दिवाळीच्या दिवशी झाला. त्यामुळे दिवे लावून आनंद साजरा करण्यात आला.

- इ.स.पूर्व चौथ्या शतकात लिहिलेल्या कौटिल्य अर्थशास्त्रानुसार कार्तिक अमावस्येला मंदिरे आणि घाटांवर (नदी किनारी) मोठ्या प्रमाणात दिवे लावले जात होते.

# धनत्रयोदशी पौराणिक कथा

धनत्रयोदशीच्या दिवशी माता लक्ष्मी आणि कुबेर यांची पूजा केली जाते. असे म्हटले जाते की या दिवशी देवी लक्ष्मी प्रसन्न झाली तर समजून घ्या की त्या भक्ताचे घर धन-धान्याने भरेल. खरं तर कित्येकशे वर्षांपूर्वी, जेव्हा देव आणि दानवांच्या युद्धात देव हरले तेव्हा समुद्रमंथन झाले. मंथन दरम्यान बरेच काही बाहेर आले जे आपापसात वाटले गेले. नंतर भगवान धन्वंतरीजी हातात अमृताचे भांडे घेऊन बाहेर पडले. त्यांच्या दुसऱ्या हातात आयुर्वेदशास्त्र होते. दानव आणि देव दोघेही अमृतासाठी लढू लागले. नंतर भगवान विष्णूने मायेची निर्मिती करून देवांना अमृत पाजले. धनत्रयोदशीशी संबंधित अनेक पौराणिक कथा आहेत, त्यापैकी दोन आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.



**पहिली कथा :** एकेकाळी हेम नावाचा राजा होता, त्याला मुलगा झाला. मुलाची कुंडली तयार केली तेव्हा ज्योतिषांनी सांगितले की मुलाचा मृत्यू लग्नानंतर बरोबर चार दिवसांनी होईल. हे ऐकून राजाला खूप वाईट वाटले आणि त्याने राजपुत्राला अशा ठिकाणी पाठवले जिथे त्याला एकही मुलगी दिसणार नाही, पण एकदा एक राजकन्या तिथून निघाली आणि दोघेही एकमेकांना पाहून मोहित झाले आणि त्यांनी गंधर्व विवाह केले. लग्नानंतर नेमके तेच झाले आणि चार दिवसांनी यमदूत त्या राजपुत्राचा जीव घ्यायला आला. जेव्हा यमदूत त्याला घेऊन जात होते तेव्हा त्याच्या पत्नीने खूप आक्रोश केला, पण यमदूतांना त्यांचे काम करावे लागले. नवविवाहित वधूचा विलाप ऐकून यमदूतांनी यमराजांना विनंती केली, हे यमराज अकाली मृत्यूपासून मनुष्याची सुटका होऊ शकेल असा कोणताही उपाय सांगा. यमदेवता म्हणाले हे दूत, अकाली मृत्यू हे कर्माचे फळ आहे, त्यापासून मुक्त होण्याचा एक सोपा उपाय सांगतो. आश्विन कृष्ण पक्षातील त्रयोदशी रात्री माझ्या नावाने पूजा करून दक्षिण दिशेला दीप अर्पण करणार्‍याला अकाली मृत्यूची भीती नसणार. यामुळे लोक या दिवशी घराबाहेर दक्षिण दिशेला दिवे लावतात.

**दुसरी कथा :** एकदा लक्ष्मी देवी भगवान विष्णूंसोबत फिरत होत्या. एका ठिकाणी देवाने लक्ष्मींना सांगितले की, मी परत येईपर्यंत इथेच राहा. माता लक्ष्मींचे मन व्याकुळ झाले आणि त्याही भगवान विष्णूंच्या मागे दक्षिणेकडे जाऊ लागल्या. पुढे गेल्यावर मोहरीची शेते आली. शेतात बहरलेली मोहरीची फुले फारच सुंदर दिसत होती. देवी लक्ष्मींनी ए क फूल तोडून स्वतःला सजवले आणि जेव्हा त्या उसाच्या शेतात पोहोचल्या तेव्हा त्यांनी उसाच्या रसाळ आणि गोड रसाचा आस्वाद घेतला. तेव्हा भगवान विष्णू तिथे आले आणि माता लक्ष्मींवर कोपले. शेतकऱ्याच्या शेतातून चोरी केल्याचे विष्णूंनी म्हटले आणि आता त्यांना १२ वर्षे शेतकऱ्याची सेवा करावी लागणार आहे असे सांगितले. त्यानंतर आई लक्ष्मी गरीब शेतकऱ्याच्या घरी पोहोचल्या आणि तिथे राहू लागल्या. एके दिवशी देवी लक्ष्मीने शेतकऱ्याच्या पत्नीला महालक्ष्मी मूर्तीची पूजा करण्यास सांगितले. शेतकऱ्याच्या पत्नीनेही तेच केले. असे करताच त्यांचे घर ऐश्वर्याने भरू लागले आणि जीवन सुखी झाले. १२ वर्षे झाली. जेव्हा भगवान विष्णू लक्ष्मीला परत घेण्यासाठी आले तेव्हा शेतकऱ्याने त्यांना देवीला नेण्यास नकार दिला. मग देव म्हणाले की देवी लक्ष्मी कुठेही जास्त काळ राहत नाही, शापामुळे ती १२ वर्षे इथे होत्या, पण शेतकरीला देवी लक्ष्मी परत जावी अशी इच्छा नव्हती. हे ऐकून माता लक्ष्मी म्हणाल्या की जर तुम्हाला मला थांबवायचे असेल तर धनत्रयोदशीच्या दिवशी घराची साफसफाई करा, रात्री तुपाचा दिवा लावा आणि संध्याकाळी पूजा करून तांब्याच्या कलशात नाणी भरून ठेवा. या कारणास्तव दरवर्षी तेरसच्या दिवशी लक्ष्मीजींची पूजा केली जाऊ लागली.

# धनत्रयोदशीला चुकूनही या ७ वस्तू खरेदी करू नका

**धनत्रयोदशीला, ज्याला धनतेरस असेही म्हणतात, हिंदू संस्कृतीत खरेदीसाठी शुभ दिवस मानला जातो. तथापि काही वस्तू खरेदी करणे अशुभ मानले जाते आणि त्यापासून टाळावे असे सांगितले जाते. आज आम्ही आपल्या खास माहित देत त्या वस्तूंबद्दल सांगत आहोत ज्या धनत्रयोदशीला खरेदी करू नयेत:**

- **लोखंडी वस्तू :** लोखंड हे राहू ग्रहाशी संबंधित मानले जाते, जे अशुभ प्रभाव देऊ शकते. त्यामुळे लोखंडापासून बनलेल्या वस्तू, जसे की लोखंडी भांडी किंवा उपकरणे, खरेदी करणे टाळावे.
- **तेल आणि तूप :** धनत्रयोदशीला तेल किंवा तूप खरेदी करणे अशुभ मानले जाते, कारण यामुळे घरात नकारात्मक ऊर्जा येऊ शकते असे मानले जाते.
- **काचेच्या वस्तू :** काचेच्या वस्तू खरेदी करणे टाळावे, कारण त्या नाजूक असतात आणि तुटण्याचा धोका असतो, जे समृद्धी आणि सौभाग्याच्या दृष्टीने अशुभ मानले जाते.
- **काळ्या रंगाच्या वस्तू :** काळा रंग नकारात्मक ऊर्जेशी संबंधित आहे, त्यामुळे काळ्या रंगाच्या वस्तू, जसे की कपडे किंवा सजावटीच्या वस्तू, खरेदी करू नयेत.
- **खोट्या किंवा खराब वस्तू :** खोट्या किंवा कमी दर्जाच्या वस्तू खरेदी करणे टाळावे, कारण यामुळे घरात समृद्धी आणि सकारात्मकता येण्यास अडथळा येऊ शकतो.
- **सुई आणि कात्रीसारख्या तीक्ष्ण वस्तू :** सुई, कात्री किंवा इतर तीक्ष्ण वस्तू खरेदी करणे अशुभ मानले जाते, कारण यामुळे नकारात्मक ऊर्जा आणि तणाव वाढू शकतो.
- **प्लास्टिकच्या वस्तू :** काही परंपरांनुसार, प्लास्टिकच्या वस्तू खरेदी करणे टाळावे, कारण त्या पर्यावरणाला हानिकारक ठरू शकतात आणि समृद्धीच्या दृष्टीने शुभ मानल्या जात नाहीत.

# धनत्रयोदशी पूजेची विधी आणि साहित्य यादी

**धन आणि आरोग्याच्या समृद्धीसाठी धनतेरस हा विशेष महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी लोक सोने, चांदी आणि जीवनावश्यक वस्तू खरेदी करतात आणि या दिवशी देवी लक्ष्मी, भगवान धन्वंतरी आणि भगवान कुबेर यांची पूजा केली जाते. देवी लक्ष्मी संपत्ती आणि समृद्धी प्रदान करते, भगवान धन्वंतरी आरोग्य आणि दीघार्युष्य प्रदान करते आणि भगवान कुबेर घरात आनंद आणि समृद्धी आणतात. या दिवशी देवी लक्ष्मी आणि भगवान धन्वंतरीची पूजा केल्याने घरात आनंद, समृद्धी आणि आरोग्य येते. हा दिवस व्यावसायिकांसाठी विशेषतः महत्त्वाचा आहे, कारण तो त्यांच्या नवीन वर्षाची सुरुवात आहे. या वर्षी १८ ऑक्टोबर रोजी धनतेरस आहे.**

**धनतेरस पूजा विधी :**

- **आंघोळ आणि स्वच्छ कपडे :** धनतेरसच्या दिवशी सकाळी लवकर उठून आंघोळ करा आणि स्वच्छ कपडे घाला.
- **मंदिराची स्वच्छता :** घरातील मंदिर पूर्णपणे स्वच्छ करा.
- **पूजेचा पाट सजवणे :** भगवान धन्वंतरी, कुबेर जी आणि देवी लक्ष्मीची मूर्ती किंवा चित्र लाल किंवा पिवळ्या कापडावर ठेवा.
- **दिवा लावणे:** तुपाचा दिवा लावा आणि कुबेरजींच्या खाली काही तांदूळ ठेवा.
- **देवतांचे आवाहन :** गणपतीचे आवाहन करून पूजा सुरू करा.
- **तिलक आणि फुले :** देवतांना चंदनाचा तिलक लावा आणि तांदूळ, फुले, रोली इत्यादी अर्पण करा.
- **नैवेद्य आणि मंत्र :** मिठाई आणि फळे अर्पण करा. ''ॐ ह्रीम कुबेराय नमः'' या कुबेर मंत्राचा १०८ वेळा जप करा.
- **स्तोत्र आणि आरती:** धन्वंतरी स्तोत्राचा पाठ करा आणि लक्ष्मी, धन्वंतरी आणि कुबेराची आरती करा.
- **झाडूची पूजा :** नवीन झाडूला लक्ष्मी मानून त्याची पूजा करा, पवित्र धागा बांधा आणि तिलक आणि तांदूळ अर्पण करा.
- **संध्याकाळी दिवा लावा :** संध्याकाळी पीठ किंवा तिळाच्या तेलाचा दिवा लावा आणि तो घराबाहेर दक्षिण दिशेला ठेवा.
- **धणे आणि मीठ :** पूजेमध्ये अर्पण केलेली धणे दुसऱ्या दिवशी तिजोरीत ठेवा आणि मीठ घरात कुठेतरी पुरून टाका.
- **दान आणि प्रसाद :** तुमच्या श्रद्धेनुसार दान करा आणि पूजा झाल्यानंतर प्रसाद वाटा.
- नवीन झाडूची देवी लक्ष्मी म्हणून पूजा केल्याने घरात समृद्धी येते. ते दान केल्याने सौभाग्य आणि देवाचा आशीर्वाद मिळतो. सोने, चांदी, नवीन भांडी, झाडू, दिवा आणि उपयुक्त घरगुती वस्तू खरेदी करणे शुभ मानले जाते.

# घरच्या घरी धनतेरस पूजन कसे करावे?

धनत्रयोदशी किंवा धनतेरस हा दिवाळीचा दुसरा दिवस आहे, धनत्रयोदशी ही आश्विन महिन्याच्या १३व्या दिवशी असते. यादिवशी धन्वंतरी पूजन केले जाते.

- साहित्य - यामध्ये आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन (सुगंधी पिण्याचे पाणी), स्नान, वस्त्र, दागिने, गंध (केशर-चंदन), फुले, धूप, दिवा, नैवेद्य, आचमन (शुद्ध पाणी), दक्षिणायुक्त तांबूल, आरती, परिक्रमा इत्यादींचा समावेश होतो.

**धनतेरस पूजाविधी**

या दिवशी सकाळी लवकर उठा, तुमची दैनंदिन कामे पूर्ण करा आणि पूजेची तयारी करा. तुमच्या घराच्या ईशान्य कोपऱ्यात पूजा करा. पूजेदरम्यान, तुमचे तोंड ईशान्य, पूर्व किंवा उत्तरेकडे असले पाहिजे.

- पूजेदरम्यान, पंचदेवांची स्थापना करा. सूर्यदेव, भगवान गणेश, दुर्गा, शिव आणि विष्णू यांना पंचदेव म्हणतात. सर्वांनी एकत्र येऊन पूजा करावी. पूजेदरम्यान कोणताही आवाज करू नका.
- या दिवशी, भगवान धन्वंतरीची षोडशोपचार पूजा करावी. याचा अर्थ १६ विधींनी पूजा करणेः पद्य (पाणी), अर्घ्य (पाणी), आचमन (पाण्याचा घोट), स्नान, कपडे, दागिने, सुगंध, फुले, धूप, दिवे, नैवेद्य (पाणी), आचमन (तंबाखू पिणे), सुपारीची पाने, स्तोत्रांचे पठण, प्रार्थना, तर्पण (पाणी अर्पण) आणि नमस्कार (प्रार्थना). पूजा संपल्यानंतर, इच्छित फळ प्राप्त करण्यासाठी दक्षिणा (भेट) अर्पण करा.
- यानंतर, भगवान धन्वंतरी यांच्यासमोर धूप आणि दिवा लावा. त्यानंतर, त्यांच्या कपाळावर हळद, सिंदूर, चंदन आणि तांदूळ लावा. त्यानंतर, त्यांना माला आणि फुले अर्पण करा.
- पूजा करताना, अनामिका बोटाने सुगंध (चंदन, कुंकू, अबीर, गुलाल, हळद इ.) लावा. त्याचप्रमाणे, वरील षोडशोपचारातील सर्व घटकांनी पूजा करा. पूजा करताना त्यांचा मंत्र जप करा.
- पूजा केल्यानंतर, प्रसाद अर्पण करा. लक्षात ठेवा की नैवेद्यात मीठ, मिरपूड आणि तेल वापरले जात नाही. प्रत्येक ताटात तुळशीचे पान ठेवले जाते.
- शेवटी, त्यांची आरती करून आणि नैवेद्य अर्पण करून पूजा संपवली जाते.
- मुख्य पूजा झाल्यानंतर, प्रदोष काळात मुख्य प्रवेशद्वारावर किंवा अंगणात दिवे लावा. तसेच यमाच्या नावाने दिवा लावा. रात्री घराच्या सर्व कोपऱ्यात दिवे लावा.



# धनतेरसच्या दिवशी या ४ वस्तू उधार देऊ नका, देवी लक्ष्मी रुसेल



**धनतेरसचा सण दिवाळीची सुरुवात दर्शविते. हा दिवस केवळ भगवान धन्वंतरी आणि कुबेराच्या पूजेसाठी समर्पित नाही, तर या दिवशी केलेली छोटी छोटी कामे देखील संपूर्ण वर्षभर आर्थिक समृद्धी ठरवतात. पुराण आणि ज्योतिषीय मान्यतेनुसार, धनतेरसच्या दिवशी घराबाहेर काही वस्तू उधार देणे अशुभ मानले जाते. असे मानले जाते की असे केल्याने तुमच्या घराची शुभ ऊर्जा आणि त्या वस्तूसह देवी लक्ष्मीचा आशीर्वाद नष्ट होतो. या दिवशी कधीही देऊ नये अशा चार महत्त्वाच्या गोष्टी जाणून घेऊया...**

१. धनतेरसच्या दिवशी मीठ उधार देऊ नये. मीठ हे केवळ अन्नपदार्थ नाही तर ते नकारात्मक ऊर्जा आणि कर्ज दूर करण्यासाठी देखील मानले जाते. ज्योतिषशास्त्रात मीठ हे राहूचा कारक मानले जाते. धनतेरस किंवा दिवाळीच्या इतर कोणत्याही दिवशी एखाद्याला मीठ उधार देणे किंवा दान करणे म्हणजे तुमच्या घराची सकारात्मकता आणि आर्थिक स्थिरता त्या व्यक्तीला सोपवणे. असे केल्याने वर्षभर आर्थिक अडचणी आणि कर्जाच्या समस्या उद्भवू शकतात.

२. धनतेरसला दूध, दही आणि साखर देखील देऊ नये. या तिन्ही वस्तू घरात पवित्रता, गोडवा आणि शीतलता आणतात. दूध आणि दही चंद्र आणि शुक्र यांच्याशी संबंधित आहेत, जे सुख, समृद्धी आणि संपत्तीचे कारक आहेत. धनतेरसला त्यांना उधार देणे म्हणजे घराची समृद्धी आणि शांती दुसऱ्याला सोपवणे. दुसरीकडे, साखर गोडवा आणि आनंदाचे प्रतीक आहे. ती घराबाहेर पाठवल्याने घरातील गोडवा आणि नात्यांचा गोडवा कमी होतो. या दिवशी या पांढऱ्या वस्तू घराबाहेर सोडणे हे आर्थिक स्थिरता कमी होण्याचे लक्षण मानले जाते.

३. ज्योतिषशास्त्रानुसार, धनतेरसला घराबाहेर तेल उधार देणे किंवा पाठवणे हे शनीचा अशुभ प्रभाव वाढवू शकते, ज्यामुळे जीवनात अडचणी आणि आर्थिक संघर्ष निर्माण होऊ शकतात. या दिवशी सुया आणि इतर तीक्ष्ण किंवा टोकदार वस्तू उधार देणे नातेसंबंधांमध्ये कटुता आणि दुर्दैव आणू शकते. धनतेरसला हे उधार देणे घरातील शांती आणि आनंद बिघडवण्याचे लक्षण मानले जाते.

४. धनतेरसला देवी लक्ष्मीची पूजा करण्याचा मुख्य उद्देश संपत्ती आकर्षित करणे आहे. म्हणून, या दिवशी पैसे उधार देण्यास सक्त मनाई आहे. धनतेरसला कोणालाही पैसे उधार देणे म्हणजे तुम्ही लक्ष्मीला तुमच्या घरातून बाहेर काढत आहात. ज्योतिषशास्त्रानुसार, या दिवशी पैसे उधार दिल्याने वर्षभर तुमच्या घरात संपत्ती टिकून राहत नाही आणि ती सतत बाहेर पडते.

## शिंदेंच्या होमपीचवर महायुतीत कोल्डवॉर?
# ठाण्यात स्वबळाच्या बेटकुळ्या

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक



महायुतीत ठाण्यावरुन कलह होण्याची शक्यता आहे. ठाणे महापालिकेत शिवसेनेनं स्वबळावर लढावं अशी मागणी शिवसेनेच्या पदाधिका-यांनी केल्याची माहिती समोर आलीय. खुद्द एकनाथ शिंदेंनी या मागणीवर नाराजी व्यक्त केलीये. तर भाजपनंही शिवसेनेला कानपिचक्या दिल्यात. शिवाय भाजपनंही ठाण्यात स्वबळाचा नारा दिलाय.

ठाणे महानगरपालिका निवडणुकांआधी महायुतीत कमालीचे विसंवादी सूर निर्माण झाल्याचं दिसतंय. ठाण्यातील शिवसेना नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांची संघटनात्मक निवडणुकीच्या पूर्व तयारीसाठी बैठक पार पडली. या बैठकीमध्ये भाजपबद्दल नाराजीचा पाढा वाचण्यात आला. भाजपचे पदाधिकारी शिवसेना नगरसेवक पदाधिकारी करत असलेल्या विकासकामांमध्ये अडथळे आणत असल्याच्या तक्रारी यावेळी करण्यात आल्या. ठाणे महापालिका स्वबळावर लढा, अशी मागणी नगरसेवक तसेच शिवसेना पदाधिकाऱ्यांनी खासदार नरेश मस्के यांच्याकडे केलीय. ठाण्यात शिवसेनेने एकला चलो रेचे संकेत दिल्यानंतर भाजपनंही लगेच इच्छुक उमेदवारांची बैठक घेतली. ठाणे भाजपच्या १८ मंडळातून ४१६ इच्छुकांनी या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला. या बैठकीत अबकी बार ७० पार, महापौर भाजपचाच होणार अशी भूमिका भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली.

गेल्या काही दिवसांमध्ये ठाण्यात भाजप आणि शिवसेनेत कलगीतुरा रंगला आहे. ठाण्यामध्ये वनमंत्री गणेश नाईक यांनी लक्ष घातलं असून शिंदे पिता पुत्रावर सडकून प्रहार सुरु केलाय. त्यातच आता या दोन्ही पक्षांनी एकला चलो रे चा नारा दिलाय. त्यामुळे शिंदेंच्या बालेकिल्ल्यातच महायुतीत मिठाचा खडा पडणार का याबाबत चर्चा रंगल्या आहेत.

# मिठी नदी घोटाळा : सीईओ केतन कदमला न्यायालयाचा दणका... दुसऱ्यांदा फेटाळला जामीन

■मुंबई । प्रतिनिधी,

मिठी नदी स्वच्छता घोटाळ्याप्रकरणी व्हर्गो स्पेशालिटीज प्रा. लि. कंपनीचा सीईओ केतन कदमला न्यायालयाने दुसऱ्यांदा दणका दिला आहे. केतन कदमचा सत्र न्यायालयाने पुन्हा एकदा जामीन नाकारला आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन. जी. शुक्ला यांनी हा निर्णय दिला असून केतन कदम घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

**बीएमसीला तब्बल ६५ कोटींचे**

न्यायालयाने स्पष्ट केले, की कदमने शेल कंपन्यांमार्फत संशयास्पद आर्थिक व्यवहार केले असून इटउ अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून ठेक्यातून आर्थिक फायदा घेतल्याचे पुरावे आहेत. केतन कदम याने ठेकेदारांवर यंत्रसामग्री भाड्याने घेण्यासाठी दबाव टाकला. तसेच, टेंडरमध्ये विशिष्ट अटी घालून दर वाढवले. या कारणास्तव इटउ ने केलेल्या मिठी नदी स्वच्छता कामांवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. तर, यामुळे इटउ ला तब्बल ६५ कोटींचे नुकसान झाले आहे.

**कदम संपूर्ण घोटाळ्याचा सूत्रधार**

सरकारी पक्षाने न्यायालयास सांगितले, कदम संपूर्ण घोटाळ्याचा सूत्रधार आहे. बीएमसी अधिकाऱ्यांच्या दिल्ली आणि केरळ दौऱ्याचे हॉटेल व प्रवास खर्च कदमने उचलले. या खर्चांचे नियोजन अटी ठरवण्यापूर्वी केले गेले.

**कदमविरोधात ठोस पुरावे नाहीत – बचावपक्ष**

कदमच्या वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद केला की, ऋक्षफ आणि आरोपपत्रातील आरोप फक्त गृहीतकांवर आधारित आहेत. टेंडरच्या अटी कदमच्या सूचनेवर घालण्यात आल्याचे ठोस पुरावे नाहीत. इटउ ने यंत्रांच्या तांत्रिक तपशीलांचे समर्थन केले असले, तरी त्यांच्या किंमती आणि वापरावर प्रश्न उपस्थित आहेत. तसेच, या प्रकरणातील इटउ अधिकारी अजून अटकेत नाहीत, असा दावा त्यांनी केला.

**जामीन दिल्यास पुराव्यात छेडछाड**

यावर न्यायालयाने नमूद केले, इतर आरोपींना अटक झालेली नाही.




कदम प्रभावशील व्यक्ती असून तो जामिनावर बाहेर आल्यास पुराव्यांशी छेडछाड करू शकतो किंवा साक्षीदारांना धमकावू शकतो. म्हणून कदमला जामीन देणे शक्य नाही.

**ठेकेदारांच्या पैशातून स्वत: साठी लाभ**

सादर केलेल्या पुराव्यांवरून न्यायालयाने म्हटले की, व्हर्गो स्पेशालिटीज प्रा. लि. कंपनी कडून ६ कोटींची रक्कम मशीन खरेदीसाठी हस्तांतरित झाली होती, त्यापैकी २.४१ कोटी कदमच्या वैयक्तिक खात्यात जमा झाली. जरी कदमने ही रक्कम उएड म्हणून पगाराचा हिस्सा असल्याचा दावा केला, तरी वैध दस्तऐवज उपलब्ध नाहीत.

याशिवाय, लिलावकर्त्याने कदमच्या Groupo Solution आणि Woder India या शेल कंपन्यांच्या खात्यात विविध रकमा हस्तांतरित केल्या आहेत. न्यायालयाने म्हटले की, यावरून दिसते की कदमने इतर ठेकेदारांना दिलेल्या करारातून स्वतःसाठी आर्थिक लाभ मिळवला. पुढे न्यायालयाने स्पष्ट केले की, शेल कंपन्यांद्वारे झालेल्या गैरव्यवहाराचे पुरावे स्पष्ट असल्यामुळे केतन कदमला जामीन देणे योग्य नाही. प्रकरणातील तपास आणि पुढील कारवाई पुढील आदेशानुसार सुरु राहणार आहेत.

## लोंढेचे अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त
## महापालिका-पोलिसांची संयुक्त कारवाई



■नाशिक। प्रतिनिधी,

सातपूर परिसरातील गोळीबार प्रकरणी अटक केलेल्या आरपीआय आठवले गटाच्या जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे याच्या अनधिकृत बांधकामावर महापालिकेचा अखेर हातोडा पडला आहे. चार वर्षांपूर्वी नंदिनी नदीच्या पूररेषेत बांधण्यात आलेली ही अनधिकृत इमारत महापालिका आणि पोलिसांच्या संयुक्त कारवाईत जमीनदोस्त करण्यात आली.

शहरातील आयटीआय सिग्नल परिसरातील एका बारमध्ये खंडणी उकळवण्यासाठी गोळीबाराची घटना घडली होती, ज्यात एक जण गंभीर जखमी झाला. त्यावर खाजगी रुग्णालयात उपचार केले गेले.

या घटनेनंतर प्रकाश लोंढे यांचा मुलगा भूषण लोंढे आणि त्याचे काही साथीदार यांच्यावर गोळीबाराचा गुन्हा दाखल करण्यात आला, आणि नंतर लोंढे पिता-पुत्राच्या मुसक्या आवळण्यात आल्या.

लोंढेच्या इमारतीत भुयार आढळून आला, ज्यामध्ये शस्त्रास्त्रे आणि अलिशान बेडरूम असल्याचे निष्पन्न झाले. आता लोंढेच्या इमारतीचे पाडकाम झाल्यानंतर, परिसरातील झोपडपट्टीतील इतर अनधिकृत घरांनाही नोटीस पाठवून त्यावर देखील कारवाई सुरू करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

## वसईत मीटरवर आधारित सेवा सुरू करण्यासाठी टॅक्सी, रिक्षा चालकांना १५ नोव्हेंबरपर्यंत मुदत

■वसई। प्रतिनिधी,

वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात १५ नोव्हेंबरपर्यंत टॅक्सी, रिक्षा चालकांना मीटरवर आधारित सेवा सुरू करण्यासाठी मुदत देण्यात येत आहे. या क्षेत्रात मीटरवर आधारित टॅक्सी, रिक्षा सेवा १५ नोव्हेंबरपासून सुरू करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. मंत्रालयात वसई-विरार महापालिका क्षेत्रातील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत आयोजित बैठकीत मंत्री प्रताप सरनाईक बोलत होते. बैठकीस वसईच्या आमदार स्नेहा दुबे, एस.टी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वसई-विरार महानगरपालिका आयुक्त मनोज सूर्यवंशी, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर आदी उपस्थित होते.




मंत्री सरनाईक म्हणाले, वसई झ विरार महानगरपालिका क्षेत्रात शेअर टॅक्सी सेवेला परवानगी आहे. टॅक्सी, रिक्षा चालकांनी प्रवाशांची लुबाडणूक करू नये, प्रवाशांच्या तक्रारी आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातून महामंडळाने ठाणे, कल्याण मार्गावर लांब पल्ल्याची बस सेवा सुरू करावी. प्रवाशी संख्या लक्षात घेता शहर बस वाहतूक पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावी. महापालिका क्षेत्रात असलेल्या महामंडळाच्या जागांचा पार्किंग जागांसाठी उपयोग करावा. यासाठी जागा लागल्यास महानगरपालिकेने जागेचे नियोजन करावे, असे निर्देश मंत्री सरनाईक यांनी दिले. वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या विरार, वसई, नालासोपारा येथे बस डेपो सुरू करावेत. नागरिकांना परिवहन सेवा सुलभरित्या मिळावी, याबाबत महानगरपालिकेने कार्यपद्धती ठरवून अंमलबजावणी करावी, असे निर्देशही परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले.

## पशुगणनेत एमबीएमसीचा ठाणे जिल्ह्यात प्रथम क्रमांक

■भाईंदर। प्रतिनिधी,



मिरा-भाईंदर महापालिकेने पशुगणनेत ठाणे जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. ठाणे जिल्ह्यात ६ महापालिका आणि २ नगरपरिषदांचा समावेश असून, त्यापैकी मिरा-भाईंदर महापालिकेने नियोजनबद्ध अंमलबजावणी, अचूक माहिती संकलन करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या कामगिरीबद्दल महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी सबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे. शासनाच्या निर्देशानुसार मिरा भाईंदर महापालिकेने डिसेंबर २०२४ मध्ये या सर्वेक्षण मोहिमेला सुरूवात केली होती. केवळ चार महिन्यांच्या कालावधीत एप्रिल २०२५ पर्यंत शंभर टक्के गणना पूर्ण करण्यात आली.

महापालिकेने ही गणना कोणत्याही बाहेरील संस्थेला न देता महापालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली. महापालिकेच्या आस्थापनेवरील ४७ संगणक चालक आणि ६ निरीक्षक यांच्या समन्वयातून ही पशू गणना करण्यात आली. या गणनेत शहरातील प्रत्येक वॉर्ड आणि विभागातील रस्त्यावरील प्राण्यांचा समावेश करण्यात आला. यामध्ये रस्त्यावरील श्वान, गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या आणि इतर पशुधनांची बारकाईने गणना करण्यात आली. यामुळे शहरातील पशूंचे वास्तव स्थितीचे अद्ययावत आणि विश्वसनीय डेटाबेस तयार करण्यात आला आहे,असे पालिकेकडून सांगण्यात आले आहे.या उपक्रमात महत्त्वाची भूमिका बजावणार्या सर्व कर्मचार्यांना प्रोत्साहनपर मानधन म्हणून एकूण ३५ लाख रुपए रक्कम मंजूर करण्यात आले आहेत.

आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, उपायुक्त डॉ. सचिन बांगर आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम निराटले यांच्या नियंत्रणाखाली ही संपूर्ण मोहीम पार पडली. आयुक्तांच्या निदेर्शानुसार येत्या दोन दिवसांत दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा करण्यात येणार आहे. ही कामगिरी मिरा-भाईंदर महापालिकेच्या प्रगतीशील आणि परिणामकारक प्रशासनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असून, भविष्यातील सर्व उपक्रमांसाठी प्रेरणादायी ठरणारी असल्याचे आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी सांगितले.

## हर्बल हुक्क्याला परवानगी... कायद्याच्या चौकटीत राहूनच न्यायालयाचे राज्य सरकारला कारवाईचे निर्देश

■मुंबई। प्रतिनिधी,

हर्बल किंवा तंबाखूविरहित हुक्का पुरवणे कायदेशीर असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने २०१९ मध्ये दिलेल्या आदेशाची पुन्हा आठवण करून देत हर्बल हुक्कांना परवानगी असल्याचे स्पष्ट केले आणि राज्य सरकारला कायद्याच्या चौकटीत राहूनच कारवाई करण्याचे निर्देश दिले.



**याचिकाकर्त्यांचा दावा :** हर्बल हुक्का पुरवणाऱ्या रेस्टॉरंट्सवर पोलिसांनी कारवाई करू नये, यासाठी दाखल करण्यात आलेल्या अनेक याचिका न्यायालयाने निकाली काढल्या. उच्च न्यायालयाच्या २०१९च्या आदेशानंतरही पोलीस अधिकाऱ्यांकडून जबरदस्तीने कारवाई केली जात असून, त्यामुळे व्यवसायात आर्थिक नुकसान आणि अडथळा निर्माण झाला आहे, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला.

गुरुवारी न्यायमूर्ती रियाज छागला आणि फर्हान दुबाश यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित यंत्रणा तपासणी करू शकतात. जर हुक्का पार्लरमध्ये तंबाखूजन्य पदार्थ आढळले, तर संबंधित व्यक्तींवर कारवाई करता येईल, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

याचिकाकर्त्यांना रेस्टॉरंट चालवण्यास किंवा त्यांच्या म्हणण्यानुसार तंबाखू किंवा निकोटीन नसलेला हुक्का पुरवण्यास बंदी नाही, असे म्हणत न्यायालयाने स्पष्ट केले की, संबंधित यंत्रणांनी कोट्पाच्या तरतुदींनुसारच कठोर कारवाई करावी.

न्यायालयाने राज्य सरकारकडून सादर करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्राची नोंद घेतली. कोट्पा अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार फक्त सहाय्यक पोलीस निरीक्षक किंवा त्याहून वरिष्ठ अधिकाऱ्यांनाच आहे. तसेच, हुक्का पार्लरमध्ये कोणतेही अमली पदार्थ दिले जात असल्याचे आढळल्यास, संबंधित कायद्यांनुसार कारवाई करता येईल.

राजेंद्र राठोड आणि ध्रुव बी. जैन या वकिलांमार्फत याचिकाकर्त्यांनी ऑगस्टमध्ये न्यायालयात धाव घेतली होती.

## परभणीत अल्पवयीन मुलीला पोटदुखी, आई-वडिलांनी डॉक्टरकडे नेलं, अन्

■परभणी। प्रतिनिधी,

शहरात अल्पवयीन तरुणीसोबत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मागील काही दिवसांपासून सतत पोट दुखत असल्याचं अल्पवयीन मुलीने आपल्या आई-वडिलांना सांगितलं. घरची परिस्थिती बेताची असल्याने मजुरी करणाऱ्या आई-वडिलांनी आपल्या मुलीला थेट परभणीच्या जिल्हा रुग्णालयात डॉक्टरांकडे तपासणीसाठी दाखल केलं. डॉक्टरांनी तपासल्यानंतर आई-वडिलांच्या पायाखालची जमिनच सरकली.

ही अल्पवयीन मुलगी गर्भवती असल्याचं समोर आलं. त्यानंतर मुलीसोबत घडलेला प्रकार तिच्या आई-वडिलांचा सांगितला. मुलीने घरी माहिती दिल्यानंतर तिच्या आई-वडिलांनी अत्याचार केलेल्या तरुणाला फोन केला. मात्र मुलीसह तिच्या आई-वडिलांना त्याने जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मुलीच्या आईने थेट पोलीस ठाणे गाठत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचं नाव ओम बालाजी पुरी, वय २३ वर्ष, असून तो तरुण देखील त्याच गावातील रहिवासी आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परभणीच्या पूर्णा तालुक्यातील एका गावात मजुरी करणाऱ्या कुटुंबातील मुलीसोबत हा प्रकार घडला. गावातीलच तरुणाने अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं. त्यानंतर तिच्यावर सतत लैंगिक अत्याचार केले. मी तुज्यावर प्रेम करतो, मी तुज्यासोबत लग्न करणार आहे असं म्हणत या अल्पवयीन मुलीला त्याने गाफील ठेवलं. याच दरम्यान काही दिवसांपासून अल्पवयीन मुलीच्या पोटात खूप दुखू लागलं. गावापासून जवळ असलेल्या डॉक्टरांना दाखवण्यात आलं. मात्र तरीही मुलीचं पोट दुखणं थांबत नव्हतं. त्यानंतर डॉक्टरांनी परभणीच्या शासकीय जिल्हा रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला.

आई-वडिलांनी आपल्या अल्पवयीन मुलीला परभणीच्या जिल्हा रुग्णालयात दाखल केलं. उपचारादरम्यान डॉक्टरांच्या अल्पवयीन मुलगी गर्भवती असल्याची बाब लक्षात आली. त्यांनी हा प्रकार मुलीच्या आई-वडिलांना सांगितला आणि त्यांच्या पायाखालची जमिनीच सरकली. डॉक्टरांनी आई-वडिलांना सबुरीने घेण्याचा सल्ला दिला.

## विरारमध्ये लाच स्विकारताना महावितरणच्या वायरमनला रंगेहाथ अटक

■विरार। प्रतिनिधी,

नालासोपारा येथील वायरमनला पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. राजेश रामप्रसाद सरोज (४५) असे या कर्मचार्याचे नाव आहे. अर्जदाराच्या तक्रारीवरून ही कारवाई केली असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सांगण्यात आले आहे. नालासोपारा पूर्वेकडील बिलालपाडा परिसरात मोठ्या प्रमाणात वीज चोरीच्या घटना वाढत चालल्या आहेत. या वीज चोरी करर्णाया नागरिकांच्या विरोधात प्रशासनाकडून कारवाईची चाल ढकल केली जात असते. तर काही अधिकारी या ग्राहकांकडून वारंवार पैसे घेत असल्याचे नागरिकांनी बोलताना सांगितले. याच पार्श्वभूमीवर एका तक्रारदाराच्या घरातील वीज देयक थकीत असल्याने तेथे कार्यरत असलेले वायरमन राजेश सरोज यांनी वीज जोडणी खंडित केली होती. त्यानंतर तक्रारदार यांनी थकीत वीजदेयक भरणा करून पुन्हा वीज जोडणी करण्यासाठी सरोज यांना सांगितले होते. सरोज यांनी वीज जोडणीसाठी ६० हजार रुपयांची मागणी केली होती.

परंतु तडजोडी नंतर ४० हजार रुपये लाच मागितली. याप्रकरणी पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून चाळीस हजारांची लाच स्वीकारताना महावितरणच्या कर्मचार्याला गुरुवारी दुपारी दीड सुमारास रंगेहाथ पकडले आहे. याप्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक दादाराम कारंडे, पोलीस हवालदार नवनाथ भगत, पोलीस अंमलदार आकाश लोहोरे, जितेंद्र गवळे त्यांच्या पथकाने केली आहे. भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास किंवा लाच मागर्ण्याया लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आले आहे.

## लग्न नव्हे फसवणूक!!! अहिल्यानगरमध्ये बनावट नवरी, लग्नाच्या पहिल्याच रात्री लाखो रुपये घेऊन फरार

■अहिल्यानगर। प्रतिनिधी,

अविवाहित तरुणांना लग्नाचं आमिष दाखवून लाखो रुपये उकळणाऱ्या एका हाय-प्रोफाइल टोळीचा कोपरगाव पोलिसांनी पदार्फाश केला आहे. माहेगाव (ता. कोपरगाव) येथील एका तरुणाला जालना येथील रोशनी अशोक पवार नावाच्या 'बनावट नवरी'सोबत लग्न लावून देत या टोळीने त्याच्याकडून तब्बल सव्वा दोन लाख रुपये उकळले. लग्नाच्या पहिल्याच रात्रीच्या पहाटे नवरीने पळ काढल्यानं, तरुणाला आपली फसवणूक झाल्याचं लक्षात आलं.

यामप्रकरणी 'बनावट नवरी'सह पाच आरोपींविरुद्ध कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, मुख्य आरोपी महिलेला पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे.

**काय आहे नेमकी घटना?**

कोपरगाव तालुक्यातील माहेगाव येथील एका अविवाहित तरुणाला लग्नासाठी मध्यस्थांमार्फत एक तरुणी दाखवण्यात आली. ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान चर्चा आणि हे लग्न पार पडले आणि तरुणाकडून मध्यस्थांनी सव्वा दोन लाख रुपये घेतले. मात्र, लग्नाच्या पहिल्याच रात्रीच्या, पहाटेच्या सुमारास 'नवरी' घरातून पसार झाली. सकाळी फसवणूक झाल्याचं लक्षात येताच, तरुण आणि त्याच्या




कुटुंबीयांनी मध्यस्थांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण संपर्क होऊ शकला नाही. अखेर तरुणाने कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

**'मास्टरमाईंड' महिलेला अटक**

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर येथील आरोपी महिला ज्योती राजू गायकवाड ही १६ ऑक्टोबर रोजी कोपरगावात येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. कोपरगाव तालुका पोलिसांनी सापळा रचून मोठ्या शिताफीने ज्योती राजू गायकवाड हिला ताब्यात घेतलं. याच रात्री तिच्यासह, बनावट नवरी आणि तीन पुरुष साथीदारांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपी महिलेला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या गंभीर गुन्ह्याचा पुढील तपास कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक वैशाली मुकणे करीत आहेत. इतर फरार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

**अविवाहित तरुणांनो, सावधान!**

'अविवाहित तरुणांनो लग्नाचं आमिष दाखवून होणाऱ्या फसवणुकीपासून स्वतःचा बचाव करा! मागील काही वर्षांपासून अविवाहित तरुणांना लग्नाचे खोटे आमिष दाखवून त्यांची आर्थिक फसवणूक करण्याच्या घटना वाढू लागल्या आहेत. केवळ पैसे उकळण्यासाठी काही टोळ्या सक्रिय झाल्या आहेत. अशा घटना समाजासाठी अत्यंत चिंताजनक आहेत आणि यावर वेळीच कठोर उपाययोजना करणं गरजेचं आहे', असं आवाहन पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी केलं आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by Dr. Mr. Deepak Moreshwar Naik. Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com